**मौ.कोहोज-खुंटवली, ता.अंबरनाथ येथील हाल्याच्या पाडा येथील सि.स.नं.४९६५ ते ४९६८ व ७०१४ ते ७०४५ या जमिनी वाणिज्य परीमंडळातून वगळून दाटीवाटीच्या क्षेत्रात समाविष्ट करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-टिपीएस—१२१२/१४०५/प्र.क्र.२४४/१३/नवि-१२,**
**शिबिर कार्यालय, नागपूर.**
**दिनांक :- ५ जुलै, २०१८.**

**शासन निर्णय** :- सोबतची अधिसुचना महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्रात प्रसिध्द करावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,**

Ashok Kashirao Khandekar

Digitally signed by Ashok Kashirao Khandekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0b35a0c4376224197af94647ad5d3746f35b5e2e6390afc4df35bfbb6227e873, serialNumber=f69156eb95826e5c31059dc88011664594ccaec5850de17bf3f059ea7f209a75, cn=Ashok Kashirao Khandekar
Date: 2018.07.07 14:10:45 +05'30'

**(अशोक का. खांडेकर)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा.
२) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी-मुंबई.
३) संचालक ,नगर रचना,महाराष्ट्र राज्य-पुणे.
४) सहसंचालक,नगर रचना,कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
५) जिल्हाधिकारी, ठाणे.
६) उपसंचालक तथा उपसचिव(नगर रचना),मंत्रालय,मुंबई.
७) सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा, ठाणे.
(त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तूत अधिसुचनेच्या अनुषंगाने शासनाकडून अधिप्रमाणित करावयाच्या भाग नकाशाच्या ५ प्रती विहित मार्गाने शासनास सत्वर सादर कराव्यात.)
८) मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ.
९) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,चर्नी रोड,मुंबई.
(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय अधिसुचना महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्र कोकण विभागीय पुरवणी भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी ०५ प्रती या विभागास, महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, संचालक, नगर रचना,महाराष्ट्र राज्य, पुणे, सहसंचालक,नगर रचना,कोकण विभाग, कोकण भवन, सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा, जि.ठाणे व मुख्याधिकारी, अंबरनाथ यांना पाठवाव्यात.)
१०) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसुचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.
११) निवडनस्ती (कार्यासन-नवि-१२)

**<u>महाराष्ट्र शासन</u>**

**नगर विकास विभाग**

**शिबीर कार्यालय, नागपूर.**

**दिनांक :- ५ जुलै, २०१८.**

**<u>अधिसूचना</u>**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**

**क्र.टिपीएस-१२१२/१४०५/प्र.क्र.२४४/१३/नवि-१२ :-**

ज्याअर्थी, शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) च्या कलम ४० मधील तरतुदीनुसार शासन नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य विभागाची अधिसुचना क्रमांक टिपीबी-१२७५/११९९/युडी-८, दिनांक १५ मार्च, १९७६ अन्वये अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर व परिसर अधिसुचित क्षेत्राकरीता (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसुचित क्षेत्र"असा करण्यात आला आहे.) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (मुंमप्रविप्रा) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त विशेष नियोजन प्राधिकरण" असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचित क्षेत्राची विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख "उक्त विकास योजना"असा करण्यात आला आहे) तिच्या विकास नियंत्रण नियमावलीसह (यापुढे जिचा उल्लेख "उक्त विकास नियंत्रण नियमावली"असा करण्यात आला आहे) उक्त अधिनियमाच्या कलम ३१ (१) अन्वये शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्रमांक टिपीएस-१२०४/९४१/प्र.क्र.१६३/०४/नवि-१२, दिनांक २५/७/२००५ (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिसुचना" असा करण्यात आला आहे) अन्वये मंजूर झाली असून, ती दिनांक १२/८/२००५ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेच्या प्रस्तावानुसार मौ. कोहोज खुंटवली, ता. अंबरनाथ येथील हाल्याचा पाडा येथील सिसनं. ४९६५ ते ४९६८, ७०१४ ते ७०४५ या जमिनीचा काही भाग १८.०० मी. रुंद रस्त्याने बाधीत होत असुन, उर्वरित भाग वाणिज्य परिमंडळात समाविष्ट आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त जमीनी वाणिज्य विभागातून वगळून गावठाणामध्ये समाविष्ट करण्यासाठी उक्त अधिनियमातील कलम ३७(१) अन्वयेची कार्यवाही पुर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निदेश क्र.राम/टिपीएस-१२०८/४१९/प्र.क्र.२५४/१०/नवि-१२, दि.२९/९/२०११ अन्वये शासनाने उक्त विशेष नियोजन प्राधिकरणास दिले आहेत (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त निदेश" असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, शासनाच्या उक्त निदेशास अनुसरुन उक्त विशेष नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाच्या ३७(१) अन्वयेची वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन उक्त जमिनी वाणिज्य परिमंडळातून वगळून गावठाणामध्ये समाविष्ट करण्याचा फेरबदल प्रस्ताव शासनाकडे दि.२०/११/२०१२ रोजीच्या

पत्रान्वये मंजूरीसाठी सादर केला आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त फेरबदल" असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, आवश्यकती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त फेरबदल काही बदलासह मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

आणि त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोट कलम (२) अन्वये शासनास प्रदत्त असलेल्या शक्तींचा वापर करुन शासन उक्त फेरबदल प्रस्ताव काही बदलासह मंजूर करीत आहे आणि त्यासाठी उक्त विकास योजना मंजूरीच्या अधिसुचनेतील फेरबदलाच्या अनुसुचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे;

**नोंद**

*"विकास योजना भाग नकाशावर दर्शविल्याप्रमाणे मौ. कोहोज-खुंटवली, ता. अंबरनाथ येथील हाल्याचा पाडा येथील सिसनं.४९६५ ते ४९६८ व ७०१४ ते ७०४५ या जमिनी वाणिज्य परिमंडळातून वगळून दाटीवाटीच्या क्षेत्रात समाविष्ट करण्यात येत आहेत."*

**०२.** सदरचा मंजूर फेरबदल ही अधिसुचना शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनाकांपासून अंमलात येईल.

**०३.** उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा नागरीकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खाली नमूद कार्यालयामध्ये एक महिन्याच्या कालावधी करिता उपलब्ध राहील.

१) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा.

२) सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

३) सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा, जि. ठाणे.

४) मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ.

**०४.** सदर फेरबदलाची सूचना ही महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Ashok Kashirao Khandekar

Digitally signed by Ashok Kashirao Khandekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0b35a0c4376224197af94647ad5d3746f35b5e2e6390afc4df35bfbb6227e873, serialNumber=f69156eb95826e5c31059dc88011664594ccaec5850de17bf3f059ea7f209a75, cn=Ashok Kashirao Khandekar
Date: 2018.07.07 14:11:39 +05'30'

**(अशोक का. खांडेकर)**
**कार्यासन अधिकारी**

**<u>GOVERNMENT OF MAHARASHTRA</u>**
**URBAN DEVELOPENT DEPARTMENT,**
**Camp Office, Nagpur.**
**Dated :-5th July, 2018.**
**<u>NOTIFICATION</u>**

**No. TPS-1212/1405/C.R.244/13/UD-12,**

Maharashtra Regional and Town planning Act, 1966

Whereas, the Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) had been appointed as the Special Planning Authority (hereinafter referred to as "the said Special Planning Authority") under the provisions of sub-section (1) of section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") for the Ambernath, Kulgaon-Badlapur and Surrounding Notified Area (hereinafter referred to as "the said Notified Area") by the Government of Maharashtra vide Urban Development and Public Health Department Notification No.TPB-1275/1199/UD-8 dated the 15th March, 1976;

And whereas, the Development Plan for the said Notified Area (hereinafter referred to as 'the said Development Plan') along with the Development Control Regulations for the said Notified Area (hereinafter referred to as 'the said Development Control Regulation') have been sanctioned by the Government in Urban Development Department under section 31(1) of the said Act, vide Notification No. TPS-1204/941/CR-163/04/UD-12, dated the 25th July, 2005, (hereinafter referred to as "the said Notification")which has come into force with effect from 12th August, 2005;

And whereas, in the said Development Plan, the land bearing CTS No. 4965 to 4968, 7014 to 7045 Halyacha Pada at Village Kohoj-Khuntavali, Tal. Ambernath are included in Commercial Zone and partly affected by 18.00 mt. wide road (hereinafter referred to as "the said lands");

And whereas, Government in Urban Development Department has given directives to the said Special Planning Authority to delete the said land from Commercial Zone and to include the same in Gaothan vide No. RAM/TPS-1208/419/C.R.254/10/UD-12, dated the 29th September, 2011 (hereinafter referred to as "the said directives");

And whereas, as per the said directives the said Special Planning Authority, after following the legal procedure under sub-section (1) of section 37 of the said Act, has submitted a proposal for modification in the said Development Plan so as to delete the said land from Commercial Zone and to include the same in Gaothan, to the Government for sanction vide letter dated 20/11/2012(hereinafter referred to as "the said Modification");

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that it is necessary to sanction the said Modification with some changes;

Now therefore, in exercise of the powers conferred under sub section (2) of section 37 of the said Act, the State Government hereby sanctions the said Modification with some changes as described below:-

In the Schedule of modifications appended with the said Notification, after the last entry, the following new entry shall be inserted -

**viz. :-**

**<u>ENTRY</u>**

*"As shown on the part plan of the Development Plan, lands bearing CTS No. 4965 to 4968, 7014 to 7045, Halyacha Pada at Village Kohoj-Khuntavali, Tal. Ambernath are deleted from Commercial Zone and included in congested area."*

**02**.The aforesaid sanction modification shall come into force from the date of publication of this Notification in the Maharashtra Government Gazette.

**03**.The aforesaid sanctioned modification shall be made available for inspection by the general public during office hours on all working days at the following offices for a period of one month:-

1. Metropolitan Commissioner, Mumbai Metropolitan Regional Development Authority.
2. The Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai.
3. Assistant Director of Town Planning, Thane Branch, Thane.
4. The Chief Officer, Ambernath Municial Council, Ambernath.

**04.** This notification shall also be published on the Government Website at www.maharashtra.gov.in.

**By order and in the name of the Governor of Maharashtra.**

Ashok
Kashirao
Khandekar

Digitally signed by Ashok Kashirao Khandekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0b35a0c4376224197af94647ad5d3746f35b5e2e6390afc4df35bfbb6227e873, serialNumber=f69156eb95826e5c31059dc88011664594ccaec5850de17bf3f059ea7f209a75, cn=Ashok Kashirao Khandekar
Date: 2018.07.07 14:12:25 +05'30'

**(Ashok K. Khandekar)**
**Section Officer**